सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०६१५/सीआर-१३/२०२१/तीन दिनांक: १७ जून, २०२१

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय**:- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले होते.

**२**. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० [एसएलपी (सी) १५७३७/२०१९] या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना तसेच शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.३५९/१६-ब, दिनांक ३ जून,२०२१ अन्वये शासनाकडून प्राप्त अभिप्रायानुसार संबंधित जाहिरातीस अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांना पात्रतेनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल. त्यानुसार आयोगामार्फत डिसेंबर, २०१८ नंतर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातींस अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदांच्या आधारे भरतीप्रक्रिया राबविलेल्या तथापि भरतीप्रक्रियेच्या विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या व शिफारशी करण्यात न आलेल्या केवळ खालील संवर्ग/परीक्षांच्या बाबतीत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या संबंधित उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे, याकरीता विकल्प देणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव |
|---|---|---|
| १ | १२/२०१९ | महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| २ | १३/२०१९ | पशुधन विकास अधिकारी, गट-अ |
| ३ | १७/२०१९ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| ४ | १८/२०१९ | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ |
| ५ | १९/२०१९ | राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२० |
| ६ | ०२/२०२० | सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० |
| ७ | ०३/२०२० | सहायक मत्स्यव्यवसाय आयुक्त, गट-अ |
| ८ | ०४/२०२० | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, गट-ब |
| ९ | ०५/२०२० | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० |
| १० | ०६/२०२० | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२० |
| ११ | १५/२०२० | वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट-अ आदिवासी विकास विभाग |
| १२ | १६/२०२० | अनुवादक (मराठी), गट-क |

**३**. उपरोक्त पदभरती/परीक्षांकरीता अर्जाद्वारे फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विकल्प देण्यासंदर्भातील कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे:-

(१) संबंधित पदभरती/परीक्षांकरीता अर्जाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवाराने अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे, याबाबतचा विकल्प देणे आवश्यक आहे.

(२) अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा विहित कालावधीत सादर न करणाऱ्या उमेदवारांचा फक्त अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येईल.

(३) विहित कालावधीत विकल्प सादर केलेल्या अथवा विकल्प सादर न केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत एकदा सादर केलेल्या/ सादर न केलेल्या दाव्यातील बदलाबाबतची विनंती नंतरच्या टप्प्यावर कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांनी आयोगाच्या दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकास अनुसरुन कोणत्याही पदभरती/परीक्षांकरीता यापूर्वी विकल्प सादर केले असले तरी, उमेदवाराने पुन्हा नव्याने विकल्प सादर करणे आवश्यक राहील. नव्याने विकल्प सादर न केलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येईल.

(५) अराखीव (खुला) तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या लाभाकरीता विकल्प सादर करणा-या उमेदवारांनी संबंधित जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

(६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे व प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(७) अर्ज केलेल्या प्रत्येक परीक्षा/संवर्गाकरीता वरीलप्रमाणे विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(८) उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने विविध न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासनाकडून घेण्यात येणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**४.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील उमेदवारांनी उपरोक्त पदभरती/परीक्षांपैकी ज्या पदभरती/परीक्षांकरीता अर्ज केला आहे, त्या प्रत्येक पदभरती/परीक्षांकरीता अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांपैकी जो विकल्प निवडावयाचा आहे, त्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'Online Facilities' या सदराखालील 'SEBC Option Change' वर क्लिक करुन पुढीलप्रमाणे प्रक्रिया करावी:-

(१) उपरोक्त पदभरती / परीक्षांपैकी अर्ज केलेल्या पदभरती / परीक्षेची जाहिरात निवडावी.

(२) अर्जामध्ये नमूद केलेला मोबाईल क्रमांक नोंदवून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा OTP प्रविष्ठ करुन लॉगिन करावे.

(३) अराखीव (खुला) / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी सुयोग्य पर्याय निवडावा.

(४) 'Submit' बटणावर क्लिक करुन निवडलेला तपशील सादर करावा.

(५) सादर केलेला तपशील जाणून घेण्यासाठी अथवा संग्रही ठेवण्यासाठी स्वेच्छेनुसार तपशीलाची छपाई करता येईल.

**५.** प्रस्तुत कार्यपध्दतीच्या अनुषंगाने विकल्प सादर करताना अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-२६७३-८८९ अथवा १८००-१२३४-२७५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**६.** उपरोक्त वेबलिंक **दिनांक १७ जून २०२१ ते दिनांक २३ जून, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** कार्यान्वित राहिल.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग